MHNG180003382017

# - : कि.फौ.अ.क्र. ६०/२०१७ मधील निशाणी १८ व १९ खालील अर्जावरील संयुक्त आदेश : (ललिता वि निळकंठ व इतर )

१. सदरचा अर्जापैकी अर्ज निशाणी १८ हा संरक्षण अधिकारी यांनी दाखल केला असुन निशाणी १९ खालील अर्ज ललिता गणपतराव लाड यांनी दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र. १,२ व ४ हे अर्जदाराचे सख्खे भाउ असुन गैरअर्जदार क्र. ३ अर्जदाराची वहिनी आहे. अर्जदाराने गैरअर्जदारां विरुध्द कौटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ (सदर कायदा) चे कलम २३ अन्वये तात्पुरते/ अंतरिम पोटगी व इतर आदेश मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, गैरअर्जदार हे तिचे रक्ताचे नातेवाईक असुन सुध्दा त्यांनी अर्जदाराला व तिच्या आईला कुठलीही मदत केलेली नाही. अर्जदाराचे आईवडिल हयात असताना गैरअर्जदारांनी नेहमी त्यांच्यासोबत भांडण केले आहे. अर्जदाराचे वडिल मरण पावल्यानंतर अर्जदार व तिची म्हातारी आई एकमेकींच्या आधाराने जगत होत्या. अर्जदाराच्या आईची आजारपणामुळे व प्रकृती खराब झाल्यामुळे अर्जदाराने तिला वानाडोंगली येथील लता मंगेशकर दवाखान्यात भरती केले होते. तेथे अर्जदाराची आई डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत भरती होती. परंतु, तिच्या उपचाराचा कोणताही खर्च गैरअर्जदारांनी दिला नाही. अर्जदाराची आई व अर्जदार या दोघी कळमेश्वर येथील शेती वाहुन आपला उदरनिर्वाह चालवित होत्या. त्या व्यतिरिक्त त्यांच्याकडे कुठलेही उत्पन्नाचे साधन नव्हते.

३. अर्जदाराची आई दवाखान्यात भरती असताना तिची सेवा व सुश्रुषा अर्जदारानेच केली. तिच्या दवाखान्याचा खर्च सुध्दा अर्जदारानेच केला. या उलट गैरअर्जदारांनी अर्जदार व आई घरी नसल्याचा गैरफायदा घेवुन घरातील १६ ते १७ क्विंटल कापुस परस्पर विकुन टाकला. अर्जदाराला ही बाब माहित झाल्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदारांना जाब विचारला. परंतु, गैरअर्जदारांनी अर्जदाराला तिच्या आईला शिवीगाळ करुन मारहाण केली. या घटनेचा विपरीत परिणाम अर्जदाराच्या आईच्या प्रकृतीवर झाला व शेवटी १४.०२.२०१७ ला अर्जदाराच्या आईचा मृत्यु झाला. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराने अर्जदारांनी पिकवलेला कापुस व संत्रा असा एकुण रु. २५,०००/– चा शेतमाल विकुन टाकला. त्या बाबत विचारले असता गैरअर्जदाराने तिला अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन तिच्याशी भांडण केले. या आधी सुध्दा दिनांक ११.०४.२०१७ रोजी न्यायालयाने अंतरिम आदेशाच्या अर्जावरती आदेश करुन गैरअर्जदारांना अर्जदारास कोणत्याही प्रकारे त्रास देण्यापासुन, अपमानित करण्यापासुन, शारिरिक इजा करण्यापासुन तसेच आर्थिक, मानसिक छळ करण्यापासुन प्रतिबंधित केलेले आहे. परंतु, गैरअर्जदारांनी वेळोवेळी सदर आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे, त्यांच्या विरोधात गुन्हा क्रमांक १७४/२०१७ भा.द.वि. कलम २९४,५१०,३४ तसेच, कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण २००५ चे कलम ३१ व ३२ अन्वये गुन्हा क्रमांक ३६२/२०१७ नोंदविले आहे.

४. अर्जदार ही तिच्या आईच्या मालकी कब्जात असलेली शेतजमिन सर्वे नं. १५१ क्षेत्रफळ ३ हे. ३३ आर. ची वहिती करित होती. आईच्या मृत्युनंतर अर्जदार सदर मिळकत शेतजमिनीची वारस असुन सहमालक व ताबेदार आहे. परंतु, यावर्षी दिनांक २०.०६.२०२० रोजी अर्जदार सदर शेतीमध्ये बी पेरणी करण्यासाठी

ट्रॅक्टर घेवुन गेली असता गैरअर्जदाराने तिला शिवीगाळ करुन शेती पेरणी करण्यास अडथळा केला तसेच, तिला जिवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबत तिने पो.स्टे. कळमेश्वर येथे सुध्दा तक्रार दिली. परंतु, पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. गैरअर्जदार जबरदस्तीने अर्जदाराला शेती पेरण्यास अडथळा करुन तिला जमिनीतुन बेदखल करण्याचा प्रयत्न करित आहे. अर्जदाराच्या इतर बहिणींनी अर्जदाराला त्यांच्या हिस्स्याची शेती कसण्यासाठी व परेणीसाठी संमती दिली आहे. परंतु, गैरअर्जदार तिला मुद्दामुन अडथळा निर्माण करित आहे.

५. अर्जदाराकडे सदर शेती व्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे कुठलेही साधन नाही. त्यामुळे नमुद शेत जमिनीवरील कायदेशीर हिश्शेवाटणी होईपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणुन अर्जदाराला तिच्या व तिच्या बहिणीच्या हिस्स्यात येणा–या शेतजमिनीमधुन तिच्या हिस्स्यात येणारी आराजी वेगळी करुन ते कसण्यासाठी संरक्षण देण्यात यावे तसेच तिला त्या शेतजमिनीतुन बेदखल करु नये असा आदेश देण्याची विनंती केली आहे. अथवा अर्जदाराला तिच्या उदरनिर्वाहासाठी निर्वाहभत्ता म्हणुन रु.१०,०००/– प्रति महिना गैरअर्जदारांना अर्जदारास देण्यास आदेशित करावे अशी विनंती केली आहे. या व्यतिरिक्त मानसिक छळापायी एक लाख रुपये नुकसान भरपाईची मागणीसुध्दा अर्जदाराने केली आहे.

६. वरिल दोन्ही अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदारांचे म्हणणे मागविण्यात आले. परंतु, गैरअर्जदार प्रकरणात हजर झाले नाही. तसेच, त्यांनी त्यांचा जबाबसुध्दा दाखल केला नाही. त्यामुळे मुळ प्रकरणातील गैरअर्जदारांची गैरहजेरी व या अर्जातील अर्जदाराला आवश्यक असणा-या आदेशाचे स्वरुप बघता अर्ज गैरअर्जदारांच्या जबाबाविना पुढे चालविण्यात आले.

७. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराचे विद्वान वकिल श्री व्ही.के. कौटकर यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी असे म्हणणे मांडले की, आज रोजी अर्जदाराकडे उत्पन्नाचे दुसरे कुठलेही साधन नाही. त्यामुळे अर्जदार व तिच्या बहिणींच्या हिश्श्यातील शेती वाहण्यासाठी तिला संरक्षण देण्यात यावे. सदर बाब कौटुंबिक हिंसाचाराच्या कक्षेमध्ये बसणारी आहे.

८. प्रकरणातील प्रथमदर्शनी पुराव्याचे अवलोकन करण्याआधी सदर कायद्याच्या कलम २३ मधील कायदीय बाबींचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर कायद्याच्या कलम २३ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, न्यायालयास न्याय व योग्य वाटत असेल व सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही किंवा तशी होण्याची शक्यता असेल तर न्यायालय अंतरिम आदेश पारित करु शकतात. या ठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, कोणत्याही अंतरिम मागणीचा विचार करताना संपरिक्षेमध्ये अपेक्षित असणा-या भक्कम पुराव्याची आवश्यकता नाही. अंतरिम मागणीचा अर्ज निकाली काढताना सकृतदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त अर्ज निकाली काढताना सदर कायद्याच्या हेतु व उद्देशांकडे सुध्दा डोळस दृष्टीने बघणे आवश्यक आहे. सदर कायदा हा महिलां विरुध्द होणा-या हिंसाचारास प्रतिबंध करण्याकरिता तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्या करिता पारित करण्यात आला आहे. सदर कायद्यामध्ये पुरुषांच्या नैसर्गिक तसेच मुलभुत कर्तव्यांची जाणीव करुन देण्यात आली आहे. प्रत्येक पुरुषाचे हे कर्तव्य आहे की त्याने त्याच्या पत्नीचा व मुलांचा सांभाळ करावा. प्रस्तुतचे कलम २३ अन्वये न्यायालयास अंतरिम पोटगी देण्यासंबधी स्वेछाधिकार प्राप्त आहे. सदर स्वेच्छाधिकार हा निपक्षपातीपणे तसेच वैवाहिक कायद्याच्या तत्वाचे मार्गदर्शन करणारा आणि कायद्याच्या चौकटीमध्ये व कायद्याच्या उद्दिष्टांना अनुसरुन करण्यात यावा हे सर्वश्रुत आहे.

९. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांना नोटिस मिळुन सुध्दा ते प्रकरणात हजर झाले नाही. त्यामुळे दिनांक ०७.०७.२०१७ रोजी निशाणी १ वर आदेश पारित करुन सदर प्रकरण गैरअर्जदारांविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले. त्यामुळे उभय पक्षांमधील नातेसंबंधाबाबत कुठलाही उजर गैरअर्जदारांनी घेतल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, सदर कायद्यामध्ये नमुद असलेली कौटुंबिक संबंध ही बाब उभयपक्षांमध्ये असल्याचे दिसुन येते. यानंतर, सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही ही बाब पडताळुन पाहणे आवश्यक ठरते. अंतरिम पोटगीसाठी सकृतदर्शनी पुराव्याची आवश्यकता आहे. सकृतदर्शनी पुरावा व सबळ पुरावा हे दोन्हीही पुराव्याचे प्रकार एकमेकांपासुन वेगळे आहे. सबळ पुरावा हा उभयपक्षांनी दिलेल्या मैाखिक व कागदोपत्री पुरावा व त्यावर घेण्यात आलेला उलट तपास यावरुन ठरविण्यात येतो. या उलट, सकृतदर्शनी पुराव्याचे स्वरुप हे संक्षिप्त आहे. अंतरिम आदेशाच्या अर्जावर निर्णय देतेवेळी उभयपक्षांमार्फत अर्जात नमुद करण्यात आलेली तथ्ये, लेखी जबाबातील तथ्ये आणि पटलावर दाखल केलेले दस्त याचाच विचार करावा लागतो. तसेच, सदर कायद्याच्या कोणत्याही कलमाखाली आदेश करित असताना सदर कायद्याचा हेतु व उद्दिष्टांकडे सुध्दा लक्ष द्यावे लागते. सदर कायद्याचा उद्देश हा पिडीत व्यक्तिच्या पतीला अथवा त्यांचे नातेवाईकांना शिक्षा देणे हा नक्कीच नाही. या व्यतिरिक्त अंतरिम आदेश किंवा अर्जावर पिडितेच्या बाजुने आदेश झाला म्हणजे गैरअर्जदारांना प्रकरणात त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार नाही असाही कायद्याचा स्थापित नियम नाही. अंतरिम आदेशाची तरतुद केवळ काही काळासाठी अर्जदारास चरितार्थ चालविण्यासाठी पैशाच्या स्वरुपातील मदत व आवश्यक मदत जलद रितीने व्हावी किंवा तिला आवश्यक असणारे संरक्षण मिळावे यासाठी करण्यात आलेली आहे.

१०. अर्जदाराने तिला झालेल्या त्रासाबद्दल पोलिस स्टेशन, कळमेश्वर येथे गुन्हा क्रमांक १७४/२०१७ नोंदविला असल्याचे नमुद केले आहे. तसेच तिने गैरअर्जदारांनी कोणत्या कोणत्या तारखांना तिचा शेतमाल बळजबरीने विकला या बाबीची सुध्दा सुस्पष्ट वर्णन केलेले आहे. या व्यतिरिक्त दिनांक २०.०६.२०२० रोजी पो.स्टे. कळमेश्वर येथे दिलेल्या तक्रारीवरुन नोंदविण्यात आलेल्या अदखलपात्र गुन्ह्याचे रिपोर्ट ची प्रत सुध्दा पटलावर दाखल केलेली आहे. अर्जदाराने नमुद केलेल्या हिंसाचाराच्या घटना व वरिल नमुद तक्रारी या बाबत गैरअर्जदारांनी जबाब दाखल करुन उजर घेतलेला नाही. त्यामुळे, कौटुंबिक हिंसाचाराच्या बाबतीत अर्जदाराने दिलेला प्राथमिक पुरावा विना आव्हानित राहिलेला आहे. एकंदरित अर्जदाराने नमुद केलेल्या घटना मानसिक व आर्थिक छळाच्या व्याख्येमध्ये बसतात.

**११.** अर्जदाराचे विद्वान वकिल श्री व्ही.के. कौटकर यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या प्रार्थनेच्या अनुषंगाने युक्तिवाद केला. अर्जामध्ये नमुद केलेल्या प्रार्थना मान्य करुन अर्जदाराला न्याय देण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली. त्या अनुषंगाने अर्जदाराच्या मागण्यांची शहानिशा करणे आवश्यक ठरते. सदर प्रकरणामध्ये अर्जदाराने उदारनिर्वाहासाठी अंतरिम निर्वाह भत्ता प्रति महा रु. १०,०००/– ची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने नमुद करणे आवश्यक आहे की, या आधी सुध्दा अर्जदाराने अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. यावर माझे विद्वान पुर्वाधिका–यांनी दिनांक ११.०४.२०१७ रोजी आदेश करुन अर्ज अशंतः मंजुर केला. त्या आदेशामध्ये अर्जदाराला संरक्षण आदेश देण्यात आला. परंतु, अर्जदार ही सज्ञान असल्यामुळे तिला खावटी देण्यात आली नाही. त्यामुळे या अर्जामध्ये अंतरिम खावटी बाबत या आधीच मत मांडण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदाराचे वय लक्षात घेता तिला अंतरिम खावटी देता

येणार नाही. या व्यतिरिक्त अर्जदाराने शारिरिक व मानसिक त्रासापोटी झालेल्या नुकसानीसाठी रु.१,००,०००/- ची नुकसान भरपाई मागितलेली आहे. परंतु, अर्जदाराला शारिरिक व मानसिक त्रासामुळे नुकसान झाले किंवा कसे हा भाग संपरिक्षेचा आहे. पुराव्याविना त्यावर निर्णय देणे शक्य होणार नाही.

**१२.** या व्यतिरिक्त अर्ज क्रमांक १८ व अर्ज क्रमांक १९ मधील मागण्यांचा विचार करावा लागेल. अर्ज निशाणी क्र. १८ हा संरक्षण अधिकारी यांनी अर्जदाराच्या वतीने दाखल केलेला आहे. त्यामध्ये अर्जदाराचा शेतीमधील १ हे. ९० आर. एवढा हिस्सा नावे करुन देण्याची मागणी केली आहे. या उलट अर्ज क्रमांक १९ हा अर्जदाराने तिच्या विद्वान वकिलांच्या मार्फत दाखल केलेला आहे. त्यामध्ये अर्जदाराला आईकडुन वारसा हक्काने मिळालेली व संयुक्त मालकीत असलेली शेती सर्वे क्रमांक १५१ आराजी ३ हे. ३३ आर. या शेतजमिनीची हिस्सेवाटी होईपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणुन अर्जदाराच्या व तिच्या बहिणीच्या हिश्श्याची शेतजमिन निश्चित करुन द्यावी व त्यामध्ये वहिती करण्यापासुन अडथळा करु नये असे गैरअर्जदारांना आदेशित करावे अशी मागणी केलेली आहे.

**१३.** अर्जदाराचे विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, भुमापन क्रमांक १५१ मौजे कळमेश्वर मध्ये अर्जदार, गैरअर्जदार व त्यांच्या बहिणींची नावे नमुद आहेत. त्या अनुषंगाने अर्जदार शेतीची वहिती सुध्दा करित होती. अर्जदाराच्या तीन बहिणींनी त्यांची शेती वहिती करण्यासाठी अर्जदाराच्या नावे संमती व अधिकारपत्र सुध्दा लिहुन दिलेले आहे. त्यामुळे, सदर शेतीच्या वहितीतुन व मालमत्तेपासुन अर्जदाराला वेगळे न करण्याचा आदेश कौटुबिंक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार देण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

**१४.** अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी युक्तिवादा दरम्यान सुचविलेल्या बाबींवर विचार केला. पुढील चर्चे अगोदर कौटुबिंक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १८ चे विवेचन करणे क्रमप्राप्त ठरते. सदर कलमामध्ये पिडित व्यक्तिच्या बाजुने संरक्षणाचा आदेश पारित करुन प्रतिवादीला सदर कलमामध्ये नमुद केलेल्या कृति करण्यापासुन प्रतिबंधित करण्याचा स्वेच्छाधिकार न्यायालयास दिलेला आहे. त्यामध्ये मुख्यत्वेकरुन कौटुंबिक हिंसाचार करण्यापासुन, पिडित व्यक्तिच्या कार्यालयीन क्षेत्रात अथवा शाळेत शिरण्यापासुन, दुरध्वनीवरुन धमकी देण्यापासुन व मालमत्तेपासुन वेगळे करण्याच्या कृत्यांना प्रतिबंध करता येवु शकतो असे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने वरिल मागण्यांचा विचार केला असता अर्ज क्रमांक १८ मध्ये अर्जदाराने तिचा हिस्सा वेगळा करुन मागितला आहे. या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, सदर बाब दिवाणी न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारी आहे. सदर मागणी साठी अर्जदाराला वाटणीचा दावा दाखल करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, अर्ज क्रमांक निशाणी १८ मधील मागणी मंजुर करता येणार नाही. या उलट, अर्ज क्रमांक १९ मध्ये अर्जदाराने शेतजमिनीची हिस्सेवाटी होईपर्यंत अर्जदाराला वहितीसाठी आराजी करुन द्यावी व त्या शेतजमिनीच्या आराजीमध्ये गैरअर्जदारांनी अडथळा करु नये अशी मागणी केलेली आहे. अर्जदाराने त्यापैकी शेतजमिनीमधील आराजी निश्चित करुन देण्याची मागणी ही हिस्सेवाटीणीमध्ये हिस्सा मागण्यासारखीच आहे. त्यामुळे, त्यासाठी सुध्दा दिवाणी न्यायालयाच्या आदेशाची गरज आहे. अर्जदार ही सदर शेती करते ही बाब अर्जामध्ये नमुद करण्यात आलेली आहे. तिचा ताबा जमिनीवर नाही असा बचाव गैरअर्जदारांनी घेतलेला नाही. तसेच, शेतजमिनीच्या सात बारा उता–यामध्ये गैरअर्जदारांसोबत त्यांच्या बहिणी व अर्जदार यांचे संयुक्त नावांची नोंद सुध्दा आहे. या व्यतिरिक्त अर्जदाराने दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्ह्याच्या रिपोर्टवरुन दिनांक २०.०६.२०२० रोजी गैरअर्जदारांनी

तिला शेती वहिती करण्यापासुन मज्जाव केला हे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, गैरअर्जदार हे अर्जदाराला शेती करण्यापासुन रोखत आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर अधिनियमाच्या कलम १८ (इ) मध्ये मालमत्तेपासुन वेगळे करण्याच्या कृतीला प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण आदेशाची तरतुद केलेली आहे. अर्जामध्ये नमुद केलेली गैरअर्जदारांची कृती ही अर्जदाराला शेतमालमत्तेपासुन वेगळी करणारी असल्याचे दिसुन येते. अर्जदाराच्या इतर बहिणींच्या मालकीची शेती वाहण्यासाठी सुध्दा गैरअर्जदार अडथळा करतात असे म्हणणे सुध्दा अर्जदाराने मांडले. परंतु, अर्जदाराच्या तीनही बहिणी या अर्जामध्ये आवश्यक पक्ष समाविष्ट नाहीत. त्यांच्या सामाइक हिस्स्यामध्ये येणा–या शेतजमिनीमध्ये गैरअर्जदार अडथळा करतात या बाबत त्यांनी स्वतःचे म्हणणे मांडलेले नाही. त्यामुळे, त्यांच्या अनुषंगाने आदेश पारित करणे योग्य होणार नाही.

**१५.** अर्जदाराचे नाव शेती भुमापन क्रमांक १५१ मौजे कळमेश्वर मध्ये सहमालक म्हणुन नोंद आहे. त्यामुळे, तिच्या हिस्स्यातील शेती मालमत्ते मध्ये अडिअडथळा करुन तिला मालमत्तेपासुन वेगळे न करण्याचा आदेश देता येईल. वरील चर्चेच्या अनुषंगाने पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी क्र. १८ नामंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्ज निशाणी क्र. १९ अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| ३. | गैरअर्जदारांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला शेती भुमापन क्रमांक १५१ मौजे कळमेश्वर मधुन सातबारावर नमुद तिच्या हिश्श्यामध्ये अडिअडथळा करुन मालमत्तेपासुन वेगळे करण्याचा प्रयत्न करु नये. |

| | |
|---|---|
| ४. | सदर आदेशाची प्रत पोलिस स्टेशन, कळमेश्वर व संरक्षण अधिकारी, कळमेश्वर यांना देण्यात यावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत अर्जदारास विनाशुल्क देण्यात यावी. |

कळमेश्वर
दिनांक ०७.०७.२०२०

(हर्षल ना. पोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळमेश्वर, जि. नागपुर

## ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 07.07.2020 |
| Judgment dictated on | : | 07.07.2020 |
| Transcription Ready on | : | 07.07.2020 |
| Judgment checked and signed off | : | 07.07.2020 |

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Harshal Nanasaheb Pole
Date: 2020.07.09 14:45:40 +0530